भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त मौजे आरग, ता. मिरज, जि. सांगली येथील वाढीव कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीएच-२०१८/प्र.क्र.२८५/ बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ जून, २०१९.

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/ बांधकामे, दि. ९/१०/२०१५.
२) आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचे पत्र जा. क्र. सकआ/मावक/ पर्यटनस्थळ/विकसन/ प्र.क्र.४०/२०१५/का.१२/१४८९, दि.२९/१/२०१६.
३) शासन ज्ञापन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सान्यावि-२०१६/ प्र.क्र.७६/ बांधकामे, दि.२३/३/२०१६.
४) आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचे पत्र जा. क्र. सकआ/मावक/ऐति.स्थळ/ मौजे अरग/२०१९-२०/का-१२/१०२५, दि.३/६/२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेली घटनास्थळे व महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देवून या स्थळाचा विकास करणे या अंतर्गत मौजे आरग, ता. मिरज जि. सांगली येथील घटनास्थळाचा विकास करण्याकरीता विभागाच्या दि.२३/३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रू.२,०६,२८,०००/- (अक्षरी रूपये दोन कोटी सहा लक्ष अठ्ठावीस हजार फक्त) इतक्या रकमेच्या कामास मान्यता देण्यात आली आहे. आता, सदरील स्थळाचा विकास करण्याबाबतचा संदर्भ क्र.४ येथील दि.३/६/२०१९ च्या पत्रान्वये, रु.१,४६,२०,३००/- (अक्षरी रूपये एक कोटी शेहचाळीस लक्ष वीस हजार तीनशे फक्त) इतक्या रकमेचा वाढीव कामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. उपरोक्त वाढीव प्रस्तावास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे (लेखाशिर्ष २२२५ डी८२३) या अंतर्गत मंजूरी देण्यात आली आहे.

२. त्यानुषंगाने मौजे आरग, ता. मिरज जि. सांगली येथील ऐतिहासिक स्थळाचे सुशोभिकरण व बुध्द विहाराच्या अंतर्गत सजावट याबाबतचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेस सहमती दर्शविण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या छाननीअंती सदर प्रस्ताव सन २०१८-१९ च्या दरसूचीवर आधारीत सविस्तर अंदाजपत्रक, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मिरज यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांनी साक्षांकित केले आहे. तसेच मौजे आरग, ता.मिरज, जि. सांगली येथील स्थळ विकसित करण्यासाठी रू.१,४६,२०,३००/- (अक्षरी रूपये एक कोटी शेहचाळीस लक्ष वीस हजार तीनशे फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास विभागाने

त्यांचेकडील उपलब्ध निधीतून भागवावा. तसेच सदर कामाचे खाजगी वास्तुविशारदाकडून तयार करण्यात आलेल्या नकाशे/आराखड्यास उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, पुणे यांचेकडून तपासणी करुन साक्षांकन करणे आवश्यक असून विभागाच्या वतीने सक्षम प्राधिकाऱ्याचे साक्षांकन आवश्यक राहील या अटींच्या अधीन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुषंगाने, मौजे आरग येथील ऐतिहासिक स्थळाचे सुशोभिकरण व बुध्द विहाराच्या अंतर्गत सजावट करण्याच्या वाढीव कामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

मौजे आरग, ता. मिरज जि. सांगली येथील ऐतिहासिक स्थळाचे सुशोभिकरण व बुध्द विहाराच्या अंतर्गत सजावट याबाबतचे काम करण्यासाठी रू.१,४६,२०,३००/-(अक्षरी रूपये एक कोटी शेहचाळीस लक्ष वीस हजार तीनशे फक्त) इतक्या रकमेच्या वाढीव किंमतीच्या बांधकामास पुढील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ) काम सुरू करण्यापूर्वी नमुना नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.

ब) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करून काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१. दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.

इ) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी २०१७/ प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

ई) सदर कामाचे नकाशे/आराखड्यास उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, पुणे यांचेकडून तपासणी करून साक्षांकन करणे आवश्यक आहे. तसेच विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे यांनी साक्षांकन करावे.

उ) नियोजित जागा उपभोक्ता संबंधित यंत्रणेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

२. मौजे आरग, ता. मिरज जि. सांगली येथील ऐतिहासिक स्थळाचे सुशोभिकरण व बुध्द विहाराच्या अंतर्गत सजावट कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करून, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करून ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सांगली यांनी तात्काळ करावी.

३. सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती Recapitulation Sheet प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या रू.१,४६,२०,३००/-(अक्षरी रूपये एक कोटी शेहचाळीस लक्ष वीस हजार तीनशे फक्त) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली असून Recapitulation Sheet पुढीलप्रमाणे आहे.

Name of Work:

Proposed Interior and Campus development for Bharatratna Dr. Babasaheb Ambedkar Boudha Vihar Samajik Sabhagruh at Arag, Tal- Miraj, Dist- Sangli

Sr.No.	**Sub-Estimate Title**			**Amount**
1	Building			1,25,49,588
			Sub Total	**1,25,49,588**
	Add Contigencies	4.0 %		5,01,984
	Add Insurance towards Labour	0.50 %		62,748
	Add G.S.T. on Building	12.00%		15,05,951
			Total	**1,46,20,271**
			Say Rs.	**1,46,20,300**

४. यावर होणारा खर्च मागणी क्र.एन-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ७८९- अनुसूचित जाती घटक योजना, ०२ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे, (योजनांतर्गत-दत्तमत) लेखाशिर्ष २२२५ डी८२३ या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदर प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०६२७१६४९५५०४२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.06.27 16:55:07 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सांगली.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सांगली.

६) उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, पुणे.
७) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
८) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे.
९) सहायक आयुक्त, समाजकल्याण, सांगली.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/सांगली.
१०) निवडनस्ती (बांधकामे).